मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
अल्पसंख्याक विकास व औकाफ
कौशल्य विकास व उद्योजकता
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : ७/६/२०

सर्व प्रशिक्षणार्थी व पालक यांना नमस्कार !

आपण व आपले सर्व कुटुंबीय उत्तम असाल, अशी अपेक्षा !

यापूर्वी कधीही न अनुभवलेले असे खूप मोठे आव्हान आपल्या सर्वांसमोर कोविड - १९ च्या रूपाने उभे राहिले आहे. जगभरातील लाखो लोकांवर या आजारामुळे शारिरीक अथवा मानसिक दृष्टया आघात झाला आहे. मानवी आयुष्याशी निगडित प्रत्येक घटकावर या आजाराने गंभीर परिणाम केला असून, कौशल्य शिक्षण व प्रशिक्षण अध्ययन - अध्यापन देखील त्याला अपवाद नाही.

आम्हाला कल्पना आहे की विद्यार्थ्यांसमोर आज खूप अनिश्चितता आहे. अध्ययन - अध्यापन , प्रवेश, परिक्षा यासंदर्भात विद्यार्थ्यांच्या मनात अनेक प्रश्न आहेत. तसेच आपण सर्वच आपली प्रशिक्षण संस्था, संस्थेचा परिसर, वर्ग, मित्र-मैत्रिणी यांच्यापासून दुरावलेलो आहोत. कोविड चे संकट दूर होईपर्यंत आपल्याला आयुष्यातील या गोष्टींना जरी काही काळ मुकावे लागणार असले तरी देखील शैक्षणिक प्रवास निरंतर ठेवण्यासाठी राज्य शासनाचा कौशल्य विकास व उद्योजकता विभाग प्रयत्नशील आहे.

आव्हानातूनच नाविण्याची निर्मिती होत असते. संपूर्ण मानवजातीसमोर आलेल्या या कोविड आव्हानाला सामोरे जाण्यासाठी व अध्ययन-अध्यापनाला खीळ बसू नये याकरिता, ऑनलाइन व्यवस्थांचा वापर सुरु करण्यात आला आहे. वॉटसअ‍ॅप, यू टयूब, झूम ,एमएस टिम्स अशा पर्यायांचा वापर करण्यात येत आहे. या सर्व ऑनलाइन पर्यायांचा वापर प्रभावीपणे करून घेण्याची गरज असून, तो तसा होत असल्याचे देखील काही विभागांमध्ये निदर्शनास येत आहे.

प्रशिक्षणार्थ्यांची परिक्षा, निकाल यासंदर्भात वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येईलच. प्रवेश प्रक्रियेसंदर्भात देखील या वर्षापासून येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन, प्रवेश प्रक्रिया उत्तम व पारदर्शी होण्याकरिता महत्त्वाचे बदल करण्यात येणार आहेत.

कोविड - १९ या आजाराचे संसर्गजन्य स्वरुप विचारात घेता, प्रत्येकाने या आजारापासून स्वत:चा बचाव करण्यासाठी सजग व सावध असणे आवश्यक आहे. तसेच या आजाराचा प्रतिकार करण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक सर्व सूचनांचे पालन करणे देखील गरजेचे आहे. निर्विवादपणे हा काळ आपल्या सर्वांसाठीच संकटाचा काळ असून, या काळातही आपण गुणवत्तापूर्ण कौशल्य शिक्षण व प्रशिक्षण, सुरक्षित व निरोगी वातावरण उपलब्ध करणे ही आपल्या विभागाची जबाबदारी असून, त्याकरिता मी आपणा सर्वांना आश्वासित करु इच्छितो.

आपण सर्वांनी शिकण्याचा उत्साह व तळमळ कायम ठेवावी, अशी अपेक्षा आपणांकडून व्यक्त करतो. तसेच आपण सर्व सुरक्षित रहा, निरोगी रहा अशी मी आशा बाळगतो.

शुभेच्छांसह !!

(नवाब मलिक)